स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६—२७/३६०

दि. १९/११/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: निवडणूक विषयक स्पर्धांचे आयोजन करणेबाबत..
संदर्भ: १.रासेयो/२०२६—२७/३४३,दि.०६/११/२०२६ रोजीचे परिपत्रक
http://collegecirculars.unipune.ac.in/sites/documents/NSS%20Circulars/election-related%20competitions_06112026.pdf
२.मा. उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे क्र. उपजिभूसं/१७/निवडणूक—१/कावि/४१/२०२६, दि.१७ नोव्हेंबर, २०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्र क्र.१ नुसार आपणास कळविण्यात आले होते की मा.भारत निवडणूक आयोगाने दि. ०२ ते २० नोव्हेंबर २०२६ दरम्यान निवडणूक विषयक निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत निर्देशीत करण्यात आले होते.

तथापि संदर्भीय पत्र क्र.२ नुसार मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी सुधारित वेळापत्रकानुसार दि. १७ नोव्हेंबर ते १९ डिसेंबर २०२६ या कालावधीमध्ये निवडणूक विषयक निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयामार्फत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या सहभागातून सदर स्पर्धांचे आयोजन करण्यात यावेत. सदर उपक्रम यशस्वी करण्याकरिता आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. सदर माहिती जास्तीत जास्त विद्यार्थीपर्यंत पोहचवावी आणि आपले संकेतस्थळ, सोशल मिडीया पेज तसेच WhatsApp ग्रुपद्वारे जनजागृती करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.17,पुणे यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी. विंग ,पुणे

E Mail ID- sloa17pune@gmail.com

क्र.उपजिभूसं/१७/निवडणूक-१/कावि/41 /२०२६ दि. 17/११/२०२६

प्रति,

सर्व विद्यापीठे/महाविद्यालये,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा

विषय:- निवडणूक विषयक स्पर्धांचे आयोजन करणेबाबत...
सुधारित वेळापत्रक

संदर्भ:- 1) भारत निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. 491/SVEEP-I/ ELC-Comp/2026, दि. 30/10/2026
2) या कार्यालयाकडील पत्र क्र.उपजिभूसं/१७/निवडणूक-१/कावि/ 39/2026, दि. 06/11/2026
3) मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. ईएलसी-2026/प्र.क्र. 58/निवडणूक-5, दि. 17/11/2026

उपरोक्त संदर्भिय क्र. 1 च्या पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोगाने दि. 02/11/2026 ते दि. 20/11/2026 या कालावधीमध्ये निवडणूक विषयक निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील कार्यालयामार्फत निवडणूक विषयक स्पर्धांचे आयोजन करून त्याबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

तथापि संदर्भ क्र. 3 च्या पत्रान्वये मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी सुधारित वेळापत्रकानुसार दि. 17 नोव्हेंबर 2026 ते 19 डिसेंबर 2026 या कालावधीमध्ये सदर निवडणूक विषयक स्पर्धांचे आयोजन व परितोषिक वितरण करणेबाबत निर्देश दिले आहेत. सोबत संदर्भिय प्रत जोडली आहे.

तरी संदर्भिय पत्रामध्ये निर्देशित केलेनुसार दि. 17/11/2026 ते 19/12/2026 या कालावधीमध्ये निवडणूक विषयक निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आपले विधानसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकारी यांचेशी समन्वय साधून नियोजित दिनांकांस आयोजन करण्यात यावे.

तसेच सदर स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणेकामी महाविद्यालयांची संकेतस्थळे, सोशल मिडिया पेजेस तसेच Whatsapp ग्रुपद्वारे स्पर्धांबाबत जनजागृती करण्यात यावी.

(अमिता तळेकर)
उपजिल्हाधिकारी तथा
स्वीप नोडल अधिकारी ,पुणे

प्रत:- १.मा. मुख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट् राज्य, मुंबई यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.
२.उपजिल्हा निवडणूक अधिकारी , पुणे यांचेकडे माहितीसाठी.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
दूरध्वनी क्रमांक :-०२२-२२८५६६६२, ई-मेल:-sveep-election@mah.gov.in

क्र. ईएलसी-२०२६/प्र.क्र.५८/निवडणूक-५
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०००३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२६.

प्रति,

१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई
२) जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर
३) जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर
४) उर्वरित सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी

विषय :- शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) द्वारे निबंध आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा सुधारित वेळापत्रकाप्रमाणे आयोजित करण्याबाबत.

संदर्भ :-१) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ४९१/SVEEP-I/ELC-Comp /२०२६, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६.
२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६.
३) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडील ई-मेल दिनांक १६ नोव्हेंबर २०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधिन क्र.१ येथील पत्रातील निर्देशांस अनुसरून या कार्यासनाच्या संदर्भाधीन क्रमांक २ च्या पत्रान्वये राज्यातील शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) द्वारे निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते. तथापि, राज्यातील शाळा व महाविद्यालयांना दिनांक ०४.११.२०२६ ते १५.११.२०२६ या कालावधीत असलेली दिवाळी सुट्टी विचारात घेता, भारत निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्रमांक ३ येथील ई-मेल संदेशाद्वारे सुधारित स्पर्धा कार्यक्रमास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार राज्यामध्ये निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धा खालील सुधारित वेळापत्रकाप्रमाणे आयोजित करण्यात याव्यात :-

अ.क्र.	**टप्पा / स्तर (Round / Level)**	**आयोजन अधिकारी**	**सुधारित वेळापत्रक (Revised Schedule)**
१	स्पर्धेची सुरुवात (Launch of Competitions)	राज्य स्तर (State)	**१७ नोव्हेंबर, २०२६**
२	संस्था स्तर व प्रत्येक स्पर्धेतून २ विद्यार्थ्यांची निवड	समन्वयक, निवडणूक साक्षरता क्लब (ELC)	**१८ नोव्हेंबर, २०२६ ते २७ नोव्हेंबर, २०२६**
३	विधानसभा मतदारसंघ स्तर (AC) व प्रति मतदारसंघ १० विद्यार्थ्यांची निवड	मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यालय	**०७ डिसेंबर, २०२६ ते १२ डिसेंबर, २०२६**

४	जिल्हा स्तर (अंतिम फेरी)	जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (DEO) कार्यालय	**१४ डिसेंबर, २०२६ ते १८ डिसेंबर, २०२६**
५	निकाल जाहीर करणे व प्रमाणपत्रांचे वाटप	जिल्हा (DEO), विधानसभा (ERO) व संस्था स्तर (ELC)	**१९ डिसेंबर, २०२६ ते २२ डिसेंबर, २०२६**
६	जिल्हा स्तरावरील अंतिम निकाल व अनुपालन अहवाल (Annexure-II) या कार्यालयास सादर करणे	जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (DEO) कार्यालय	**२३ डिसेंबर, २०२६ पर्यंत (भारत निवडणूक आयोगास दि. २४.१२.२०२६ पर्यंत अहवाल सादर करावयाचा असल्याने)**

३. सदर स्पर्धेच्या अनुषंगाने स्पर्धा कालावधी वगळता इतर सर्व सूचना भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्रातील मूळ निर्देशांप्रमाणेच कायम राहतील.

४. तरी, भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक ३०.१०.२०२६ रोजीच्या पत्रातील निर्देशांस अनुसरून आपल्या स्तरावरून तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल विहीत कालावधीत व नमुन्यात या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(मनोहर पारकर)
सह सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी

सोबत:- वरीलप्रमाणे

प्रत :- उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हानिवडणूक अधिकारी (सर्व) यांना आवश्यक कार्यवाहोस्तव अग्रेषित.